# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई


MUMBAI-
21 OCT 1999
RECEIVED

जावक क्र.सस/तांशा-2/परिपत्रक/ 3124 दिनांक : 15/10/1999

## //तांत्रिक परिपत्रक क्र.29//

विषय :- ग्रामीण पाणी पुरवठा योजनाच्या अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचा उपयोग करुन घेण्याबाबत.

संदर्भ :- अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक 28/9/99

कामाचा व्याप जास्त असल्यामुळे, ज्या गावांसाठी नवीन पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत त्या योजनांबाबत सध्या वितरण व्यवस्थेचे काम करतांना अस्तित्वातील वितरण व्यवस्थांची माहिती घेऊन सर्वेक्षण करुन व आवश्यक तांत्रिक हिशेब, उपयोगीता इत्यादी तपासण्यास पुरेसा वेळ मिळत नाही त्यामुळे वितरण व्यवस्थेसाठी पाईपचा किमान उपलब्ध व्यास व पाण्याची गरज याचा विचार करुन व मुख्य पाईपच्या व्यासाबाबत तांत्रिक विचार करुन सध्या वितरण व्यवस्था टाकण्यात येत आहेत., असे अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ अभियंता संघटना यांनी संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणास खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

1. योजनेची इतर कामे सुरु असतांना वितरण व्यवस्थेबाबत खात्याच्या यापूर्वीच्या पध्दतीप्रमाणे सविस्तर सर्वेक्षण, नकाशे व अंदापत्रके तयार करुन ते आपल्या स्तरावर तांत्रिक दृष्टया तपासून मंजूर करण्यात यावेत व मगच नवीन वाढीव वितरण व्यवस्थेचे काम हाती घ्यावे.

2. अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेता यावा या उद्देशाने जुनी वितरण व्यवस्था व नवीन वितरण व्यवस्था यांची अेकत्रित संकल्पना (Hydraulic Design) करुन अस्तित्वातील वितरण व्यवस्थेतील पाईप्स नवीन संकल्पनेनुसार हव्या त्या दाब क्षमतेचे आहेत याची खात्री करावी. तसेच आवश्यक नसेल तेथील नवीन वितरण व्यवस्थेची कामे करण्यात येऊ नयेत.

3. कोणत्याही परिस्थितीत वर अुल्लेख केल्याप्रमाणे तपासणी न करता वितरण व्यवस्थेची कामे करु नयेत.

4. वर उल्लेख केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत क्षेत्रीय अभियंत्यांना त्वरितसूचना देण्यात याव्यात.

(राजेंद्र सगणे)

सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,

सचिव, पा.पु.व स्व.विभाग मंत्रालय मुंबई

सदस्य सचिव (प्रशासन) म.जी.प्रा. मुंबई

विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता म.जी. प्रा. नवी मुंबई.

सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.

सर्व अधीक्षक अभियंता

सर्व कार्यकारी अभियंता(सर्व उप विभागीय अधिका–यांसाठी जादा प्रतीसह )

श्री.प्रकाश रा.हळेमनी अध्यक्ष म.पा.पु.ज.नि.अभियंता संघटना प्लॉट नं.35 केदारनगर मु.मोरेवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर 416007 यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहितीसाती.